# बृहन्मुंबई महानगरपालिका
## लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई-22

क्रमांक - लोटिरु /34109/ विप्र
दिनांक –17.01.2022

## <u>जाहिरातीचा मसुदा</u>

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या आस्थापनेवरील ' चित्रकार ' संवर्गातील 02 रिक्तपदे कंत्राटी पध्दतीने (6 महिन्यासाठी ) भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. विहित नमुन्यातील अर्ज www.portal.mcgm.gov या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. 300/- + 5% जीएसटी रु. 15/- = एकूण रु. 315 आणि आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये 200+5% जीएसटी असे एकूण रु. 210/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 27.01.2022 पर्यंत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून ) सकाळी 11 ते दुपारी 2 वाजेपर्यंत भरुन, त्याची पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात सादर करावा. (दूरध्वनी क्र. 02224063017 विद्यालय आस्थापना विभाग)

**पदाचे नाव -** चित्रकार

**<u>शैक्षणिक अर्हता -</u>**

1. उमेदवार शासनमान्य जी.डी. आर्टस चित्रकारितेची पदविका किंवा Bachelor of Fine Arts (BFA) पदवी प्रमाणपत्र धारक असावा.

2. उमेदवाराने शासनमान्य संस्थेमधून छायाचित्रणातील एक वर्षाचा कोर्स पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारक असावा.

3. उमेदवार मान्यताप्राप्त संस्थेचे फोटोशॉप, कोरल ड्रॉ (ग्राफिक डिझाइन ) सॉफ्टवेअरचे प्रमाणपत्र धारक असावा व त्यास सदर कामाचा किमान 1 वर्षाचा अनुभव असावा.

4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

5. उमेदवार ' डीओईएसीसी ' सोसायटीचे 'सीसीसी ' किंवा 'ओ स्तर ' किंवा ' ए स्तर' किंवा ' बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एमएससीआयटी ' किंवा 'जीईसीटी ' चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगण हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने / तिने शासनाने विहित केलेली 'एमएससीआयटी ' ची परीक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची/ तिची सेवा समाप्त करण्यात येईल.

6. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

7. **वयोमर्यादा –** अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये नसल्यास उमेदवाराचे वय 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा 43 वर्षे ( शासनाने वेळोवेळी केलेले बदल अंमलात आणण्यात येतील. )

<u>सर्वसाधारण अटी -</u>

1. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MSCIT OR GECT चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

3. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी(Trade Test ) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

4. उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

5. उमेदवाराने पदविका /पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

6. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

7. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणत्याही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

8. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

9. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

10. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

11. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतनमिळकतीनुसार) बॉन्ड पेपर वर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.

12. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

13. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

14. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

15. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

16. कंत्राटी चित्रकार याला दरमहा एकूण रु. 18,000/- एवढे निश्चित वेतन मिळेल. या वेतना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. सदर वेतनातून व्यवसाय कर वजावट करण्यात येईल.

17. उपरोक्त पदाची कंत्राट तत्वावर नियुक्ती 6 महिन्यांपेक्षा जास्त नाही, अशा प्रकारे करण्यात येईल. सदर कालावधीत नियमित तत्वावर चित्रकार संवर्गातील रिक्त पद भरण्यात आल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक / सेवा समाप्त करण्यात येईल.

18. त्याच्या सेवेच्या 6 महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यांची सेवा दर 29 दिवसानंतर एक दिवस खंडीत करण्यात येईल.

19. सदर उमेदवाराला रुग्णालयीन वेळेच्या अनुषंगाने काम करावे लागेल.

20. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.

21. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

22. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निंवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

23. त्यांची नियुक्ती  पोलीस ना हरकत प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून 15 दिवसांच्या आत सादर करण्यासापेक्ष करण्यात येईल.

24. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल.  त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

<u>विशेष सूचना –</u>

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

क) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सही/-
डॉ. मोहन जोशी
अधिष्ठाता
लो.टि.वै.महाविद्यालय व रुग्णालय

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 02224066381-89/ दूरध्वनी क्रं. – 022 28541017-18.

**अर्जाचा नमुना**

पदाचे नाव:

प्रति,
अधिष्ठाता,
लो.टी.म.वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,
मुंबई - 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये _______________ पदाकरिता दिनांक _______________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

______________________________________________________________________

2) पत्ता (कायमचा) : दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र -

ई – मेल आयडी -

______________________________________________________________________

______________________________________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :

______________________________________________________________________

4) पदाचे नाव _________________________

5) जन्म दिनांक: ________________________________

6) वजन: _________________ किलोउंची: _____________________ सें.मी.

7) वय:

8) शैक्षणिक अर्हता: _______________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

आपला / आपली विश्वासू,
अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक :

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत: ______________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: ______________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): ______________________________

4) पत्ता ______________________________

______________________________

5) दूरध्वनी क्रमांक:______________________________

6) ई – मेल आयडी______________________________

7) लिंग– पुरुष ______________स्त्री ______________

8) जन्मदिनांक: दिनांक________ महिना________ वर्ष _________

दिनांक ________________ रोजी असलेले वय ________ महिने _______ दिवस____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | दहावी / बरावी परीक्षेतील गुण | | | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | | इंग्रजी | | |
| | | | | | गुण | पैकी | गुण | पैकी | |
| दहावी | | | | | | | | | |
| बारावी | | | | | | | | | |
| पदविका | | | | | | | | | |
| पदवी | | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | | |

10) कामाचा अनुभव: ______________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता:

______________________________

______________________________

12) उंची: ____ फूट __ इंच, वजन: ______ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ

वर्ण: _________ नेत्र वर्ण: _________ वैयक्तिक खून:______________________

13) संगणक विषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ________________________________________________

__________________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही.

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: